तात्काळ/कालमर्यादा:-

क्र.पोमसं/८-अ/रिक्त पदे/लघुलेखक/२२२/२०११ मुंबई, दिनांक :- २७/०१/२०१७

**<u>विषय:</u>** पोलीस महासंचालक महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या अधिपत्याखाली जिल्हा लिपीक संवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक,उच्चश्रेणी लघुलेखक व स्वीय सहायक या संवर्गातील साखळी त्रिमीती पदांमधील एकूण १२ पदे लघुटंकलेखक पदात श्रेणी अवनत करुन लिपीक प्रवर्गातून पदोन्नतीने भरणेबाबत..

*****

**<u>ज्ञापन/परिपत्रक:-</u>**

महाराष्ट्र शासन गृह विभाग,शासन निर्णय क्रमांक एमआयएस-०४१२/प्र.क्र.२८४/पुर्नबांधणी क्र.१५/पोल-५ ब,दि.१६/१२/२०१६ अन्वये पोलीस महासंचालक,महाराष्ट्र राज्य,मुंबई यांच्या अधिपत्याखालील जिल्हा लिपीक संवर्ग /मुफसल लिपीक संवर्ग व शहर लिपिक संवर्गातील निम्नश्रेणी लघुलेखक,उच्चश्रेणी लघुलेखक व स्वीय सहायक या संवर्गातील साखळी त्रिमीती पदांमधील एकुण ५२ पदे खालील अटी व शर्तीच्या अधीन राहून लघुटंकलेखक पदात कायमस्वरुपी श्रेणी अवनत करण्यास मान्यता देण्यात आली आहे :-

१) लघुटंकलेखकांची सरळसेवेची व पदोन्नतीची पदे भरल्यानंतर शासनाने विहीत केलेली बिंदुनामावली पोलीस महासंचालक यांनी तयार करावी.

२) <u>वरिष्ठ श्रेणी लिपीक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या जिल्हा लिपीक,मुफसल लिपीक व शहर लिपीक या संवर्गातील कर्मचाऱ्यांना लघुटंकलेखक पदासाठी सेवाप्रवेश नियमांत विहीत केलेल्या तरतुदीनुसार लघुटंकलेखकानाचे व टंकलेखनाचे अर्हता प्रमाणपत्र धारकांना पदोन्नतीसाठी पात्र समजण्यात यावे.</u>

३) निम्नश्रेणी लघुलेखक पदाची विहित अर्हता धारण करणाऱ्या कर्मचाऱ्यांना लघुटंकलेखक पदावर नियमित ३ वर्ष सेवा पुर्ण झाल्यावर ज्येष्ठता अधीन पात्रता निकष पुर्ण केल्यास पदोन्नती देण्यात येईल.

४) सदरची पदे कायमस्वरूपी लघुटंकलेखक पदावर श्रेणी अवनत केल्याने शासनावर आर्थिक बोजा पडणार नाही व ही पदे कायम पदावनत केल्यानंतर रिक्त होणाऱ्या पदांसाठी पदनिर्मिती करता येणार नाही.

२. सदर श्रेणीअवनतीमुळे पोलीस महासंचालक यांच्या जिल्हा लिपीक संवर्गात लघुटंकलेखकांची एकूण २४ पदे नव्याने निर्माण झालेली आहेत. त्यामधील १२ पदे सरळसेवेने व १२ पदे पदोन्नतीने भरावयाची आहेत. त्यामुळे पोलीस महासंचालक यांच्या जिल्हा लिपिक संवर्गातील लघुटंकलेखकांच्या बिंदुनामावलीनुसार पदोन्नतीने भरावयाच्या १२ पदांसंदर्भात पोलीस महासंचालक यांच्या जिल्हा लिपीक संवर्गातील वरिष्ठ श्रेणी लिपीक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांना खालील बाबी निदर्शनास आणून देण्यात येत आहेत:-

१) सामान्य प्रशासन विभागाने शासन अधिसुचना सा.प्र.वि.क्र.एएससी-१५९३/३६१९/१४-अ, दि.३१/०७/१९९७ अन्वये **लघुटंकलेखक** पदाचे सेवाप्रवेश नियम विहीत केले असुन,सदर सेवाप्रवेश नियमानुसार लघुटंकलेखक पदासाठी **८० श.प्र.मि.यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखनाचे आणि ४० श.प्र.मि.यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे इंग्रजी टंकलेखनाचे किंवा ३० श.प्र.मि.यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे मराठी टंकलेखनाचे शासकीय वाणिज्य प्रमाणपत्र असणे** आवश्यक आहे.

२) लघुटंकलेखक पदावरील पदोन्नती स्विकारण्यास ईच्छुक असणाऱ्या लिपिकांचे लघुटंकलेखक पदी पदोन्नतीमुळे त्यांच्या मुळ लिपिक संवर्गातील पदोन्नतीचे लाभ,तसेच आश्वासित प्रगती योजनेनुसार लिपिक पदाची वेतनश्रेणी मिळण्याचा हक्क संपुष्टात येणार आहेत.त्यामुळे संबंधिताने तसे विहीत नमुन्यात लेखी बंधपत्र देणे आवश्यक राहील.

३) लघुटंकलेखक पदावर नेमणूक दिल्यानंतर सदर पदावर नियमित ३ वर्ष सेवा पुर्ण झाल्यावर ज्येष्ठता अधीन पात्रता हा निकष पुर्ण केल्यास आरक्षणानुसार निम्नश्रेणी लघुलेखक पदावर पदोन्नती देण्यात येईल.

४) लघुटंकलेखक पदासाठी सुधारीत वेतन संरचना पे बँड १ मध्ये वेतन बँड रु.५२००-२०२००+ ग्रेड वेतन रु.२४००/-राहील.

५) पदोन्नती संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेले शासन निर्णय लागु राहतील.

३ तरी खालील नमुद घटक प्रमुखांनी त्यांच्या अधिपत्याखाली कार्यरत असलेल्या वरिष्ठ श्रेणी लिपिक पदाची वेतनश्रेणी घेणाऱ्या कर्मचाऱ्यांपैकी जे कर्मचारी परिच्छेद क्र.२ मधील नमुद अर्हता पुर्ण करीत आहेत व अन्य बाबी मान्य करुन लघुटंकलेखक पदावर पदोन्नतीवर नियुक्तीस ईच्छुक आहेत, अशा कर्मचाऱ्यांची माहिती सोबत जोडलेल्या जोडपत्रामध्ये भरुन दि.३१/१/२०१७ पर्यंत या कार्यालयात सादर करावीत.

४ सदरचे परिपत्रक पोलीस महासंचालक यांच्या या www.mahapolioce.gov.in संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात येत आहे.

**(अर्चना त्यागी)**
**विशेष पोलीस महानिरीक्षक (प्रशासन)**
**पोलीस महासंचालक यांचेकरिता.**

प्रति,

महासंचालक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई (सस्नेह).
अपर पोलीस महासंचालक, गु.अ.वि., म.रा., पुणे/ नक्षल विरोधी अभियान, नागपूर.
आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म.रा., मुंबई.
अपर पोलीस महासंचालक, प्रशिक्षण व खास पथके / रा.रा.पो.बल, म.रा., मुंबई.
सर्व पोलीस आयुक्त (लोहमार्ग मुंबईसह)
संचालक, महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक / पोलीस बिनतारी संदेश, म.रा., पुणे
विशेष पोलीस महानिरीक्षक, रा.रा.पो.बल, पुणे / रा.रा.पो.बल, नागपूर / मो.प.वि. पुणे / महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे.
सर्व परिक्षेत्रीय विशेष पोलीस महानिरीक्षक
पोलीस उपमहानिरीक्षक, गडचिरोली परिक्षेत्र, गडचिरोली.
सर्व पोलीस अधीक्षक (लोहमार्गसह) / विशेष कृती दल, नागपूर.
समादेशक, रा.रा.पो.बल, गट क्र. १ ते १४
सर्व प्राचार्य, पोलीस प्रशिक्षण केंद्र.
उपसंचालक गुन्हे अन्वेषण प्रशिक्षण केंद्र, नाशिक.

प्रत,

पोलीस उप अधीक्षक,संगणक कक्ष,पो.म.सं.कार्यालय,मुंबई.

२. सदरचे परिपत्रक कृपया पोलीस महासंचालक यांच्या संकेतस्थळावर उपलब्ध करुन द्यावे.

प्रत माहितीकरीता सस्नेह सादर:-

अपर मुख्य सचिव महाराष्ट्र शासन गृह विभाग,मंत्रालय,मुंबई ४०० ०३२.
(लक्षवेध :- श्री.सुरेश खाडे,उप सचिव )

**जोडपत्र - अ**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | अर्जदार कर्मचाऱ्याचे पूर्ण नाव व पदनाम | :- | |
| २. | अ) जन्मदिनांक (सेवापुस्तकाच्या प्रथम पृष्ठाच्या साक्षांकित प्रतीसह)<br>ब) सेवानिवृत्तीचा दिनांक | :- | |
| ३. | लिपिक पदावरील नेमणूकीचा दिनांक/ नियुक्तीचा प्रकार (लिपिक-टंकलेखक/कश्रेलि)<br>(सरळसेवा / पदोन्नती) | :- | |
| ४. | जात व जातीचा प्रवर्ग व जात वैधता प्रमाणप्रत्र (साक्षांकित प्रतीसह) | :- | |
| ५. | सध्याचे नेमणूकीचे ठिकाण व संवर्ग | :- | |
| ६. | अ) सध्याचे वेतन बॅंड<br>ब) सध्या घेत असलेले मूळ वेतन + ग्रेड वेतन | :- | |
| ७. | अपंग आहे काय? असल्यास अपंगत्वाचा प्रकार नमुद करावा. (अस्थीव्यंग / दृष्टीदोष / कर्णबधीर इ.) नमूद करावा. | :- | |

**अर्जदाराने सादर करावयाचे बंधपत्र**

मी ......................................................................................... लघुटंकलेखक पदावर पदोन्नती घेण्यास इच्छुक असून, लघुटंकलेखक पदावर पदोन्नती दिल्यानंतर लिपिक पदाच्या पदोन्नती साखळीतील पदोन्नतीचे लाभ तसेच आश्वसित प्रगती योजनेनुसार लिपिक पदाची वेतनश्रेणी मिळण्याचा माझा हक्क संपुष्टात येईल, याची मला जाणीव असून लघुटंकलेखक पदावरील पदोन्नती संदर्भातील सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

दिनांक : / /२०१७
ठिकाण :

स्वाक्षरी
अर्जदाराचे पूर्ण नांव व पदनाम

---

अर्जदाराच्या अर्जासोबत खालील साक्षांकित क्रमानुसार सादर करावीत.

१. सेवापुस्तकातील पहिल्या पृष्ठाची साक्षांकित प्रत.
२. जातीचे प्रमाणपत्र
३. जात वैधता प्रमाणपत्र
४. मराठी टंकलेखनाचे ३० किंवा इंग्रजी ठंकलेखन ४० उत्तीर्ण केल्याचे प्रमाणपत्र
५. मराठी लघुलेखन ८० श.प्र.मि. यापेक्षा कमी नाही इतक्या गतीचे लघुलेखन